# श्री.किसनलाल नथमल गोयनका कला व वाणिज्य महाविद्यालय,
# कारंजा (लाड), जि.वाशिम.
## (वाणिज्य विभाग)
## वार्षिक अहवाल (२०१८—२०१९)

सत्र २०१८—२०१९ मध्ये बी.कॉम— १ला वाणिज्य शाखेत १०५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला प्रवेश समितीचे समन्वयक प्रो. घननिळ गजभिये यांच्या मार्गदर्शनाखाली गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात आला. तसेच बी.कॉम भाग—२ मध्ये ५३ विद्यार्थी व बी.कॉम भाग—३ मध्ये ८२ विद्यार्थ्यांनी अशा एकूण २४० विद्यार्थ्यांनी वाणिज्य शाखेत पद्वीस्तरावर प्रवेश घेतला.

वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.दिनेश रघुवंशी व सहाय्यक प्राध्यापक श्री.घननिळ गजभिये व डॉ. बलजित कौर ओबेरॉय यांच्या मार्गदर्शनाखाली सत्र २०१८—२०१९चे वाणिज्य विभागासाठी वार्षीक नियोजन करण्यात आले. त्यामध्ये वाणिज्य अभ्यास मंडळाची स्थापना,वाणिज्य अभ्यास मंडळाचे उद्घाटन, शैक्षणिक व औद्योगिक सहलीचे आयोजन, बॅंक व्हिजीट, गेस्ट लेक्चर घटक चाचणी परिक्षा, असाइन्मेंट व संगणक प्रात्यक्षिक परिक्षा इत्यादीचे आयोजन करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली.

सन २०१८—२०१९ पासुन बी.कॉम.भाग—२ च्या विद्यार्थ्यांना सत्रीय अभ्यासक्रम लागू झाल्यामुळे त्यांना अभ्यासक्रमाचे विषय, अभ्यासक्रम, परिक्षा पध्दती, क्रेडीट आणि ग्रेड पध्दती या संबंधीची माहिती देण्यात आली.

दिनांक ०५/०९/२०१८रोजी विभाग प्रमुख डॉ.दिनेश रघुवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली २०१८—२०१९ या शैक्षणिक वर्षाकरिता वाणिज्य अभ्यास मंडळाचे गठण करण्यात आले. वाणिज्य अभ्यास मंडळाच्या अध्यक्षपदी आदर्श गुल्हाने (वाणिज्य भाग—३), उपाध्यक्ष—कु.स्नेहा ठाकरे (वाणिज्य भाग—३), सचिव—कु.ममता उगले (वाणिज्य भाग—२), सहसचिव—अवैस इसा शेख (वाणिज्य भाग—२), सदस्य कु.प्रतिक्षा उंबरकर, कु. आरती ढगे, कु. श्वेता इंगोले, रामेश्वर अंजनकर, अंकुश वानखेडे, कु.मयुरी राखोंडे, यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या अभ्यास मंडळा अंतर्गत महाविद्यालयात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

दिनांक २७/०९/२०१८ गुरूवार रोजी वाणिज्य अभ्यास मंडळाचे उद्घाटन संपन्न झाले. या कार्यक्रमाला उद्घाटक व प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री आशिष पि.तांबोलकर उपस्थित होते. तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ.मिलींद पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आर्वी हे उपस्थित होते. या कार्यक्रमाला वाणिज्य शाखेचे सर्व विद्यार्थी

उपस्थित होते. व या कार्यक्रमाला नवनिर्वाचित वाणिज्य अभ्यास मंडळाच्या पदाधिकाऱ्याचा सत्कार करण्यात आला.

दिनांक १ ऑक्टोंबर २०१८ रोजी विद्यार्थी ग्राहक मार्गदर्शन शिबीर,आखिल भारतीय ग्राहक पंचायत कारंजा शाखा व महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते.

या शिबीराच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विनय कोडापे,प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा.सुधीर घोडचर तर प्रमुख अतिथी म्हणून अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हा उपाध्यक्ष श्री गोपाल पाटील भोयर, जिल्हा संघटक सहमंत्री श्री सुधीर देशपांडे,जिल्हा संघटन मंत्री श्री अभय खेडकर तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक बंधु—भगिनी, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

दिनांक ७ ऑक्टोंबर २०१८ रोजी श्रीहरी कॉम्पुटर एज्युकेशन कारंजा (लाड) यांच्या वतीने श्री योगेश भोयर यांनी विद्यार्थ्यांना २१ व्या शतकातील ''डिजीटल स्कीलस्'' या बाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दिनांक ३० ऑक्टोंबर २०१८रोजी ॲक्सीस बॅक कारंजा शाखेचे व्यवस्थापक यांचे Banking and Its Services या विषयांवर वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाला वाणिज्य शाखेचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

दिनांक ०६/०१/२०१९रोजी कॉमर्स फोरम तर्फे विभाग प्रमुख डॉ.दिनेश रघुवंशी यांच्या मार्गदर्शनात MIDC अमरावती येथील,''मेहुल इन्डस्ट्रीज'' या उद्योंगाला भेट देण्यात आली.

या उद्योंगामध्ये कच्या मालावर विविध प्रक्रिया करून जर्मनची भांडी तयार करण्यात येत असून त्यांची बाजारपेठेमध्ये विक्री,विपणन व संग्रहण तसेच निर्यात या
बाबतची सविस्तर माहिती उद्योंगाचे मालक व्यवस्थापक श्री मेहुल लोढाया यांनी दिली.

या औद्योगिक भेटीमध्ये वाणिज्य फोरमचे सर्व पदाधिकारी तसेच ४८ विद्यार्थी सहभागी झाले होते.

**विभाग प्रमुख**

**(डॉ.दिनेश रघुवंशी)**

## Photos of Programme






# News of Programme

मान्यवरांची उपस्थिती: ग्राहक हक्काविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

## कारंजात महाविद्यालयीन विद्यार्थी ग्राहक मार्गदर्शन शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कारंजा लाड :** येथील किसनलाल नथमल गोयनका महाविद्यालयातील सभागृहात १ ऑक्टोंबर रोजी दुपारी अखिल भारतीय ग्राहक पंचायत कारंजा शाखा व महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन ग्राहक जनजागृती शिबीर पार पडले.

या शिबिराच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विनय कोडापे, प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. सुधीर घोडचर तर प्रमुख अतिथी म्हणून अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हा उपाध्यक्ष गोपाल पाटील भोयर, जिल्हा संघटन सहमंत्री सुधीर देशपांडे, जिल्हा संघटन मंत्री अभय खेडकर, प्रा. दिनेश रघुवंशी, प्रा वाघमारे, कारंजा तालुका ग्राहक मंचचे अध्यक्ष विजय काळे, रोहीत महाजन, प्रज्वल गुलालकरी, व महेंद्र गुप्ता यांची उपस्थिती होती. ग्राहक पंचायतीचे कार्य व सध्याच्या काळात होत असलेल्या ग्राहकांच्या फसवणूकीबाबत प्रमुख मार्गदर्शक प्रा सुधीर घोडचर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात प्रा. घोडचर यांनी अखिल भारतीय ग्प्रहक पंचायतीचे कार्य, खरीददारविरुध्द विक्रेता, ग्राहक चळवळ कायदा, तसेच शेतकरी, विद्यार्थी व रुग्ण यांची विविध प्रकारे होत असलेली फसवणूक याबद्दल सखोल मार्गदर्शन केले. एकीकडे ग्प्रहक हा राजा आहे. असे म्हटल्या जाते. तर दुसरीकडे त्याच ग्राहक राजाची आर्थिक लूट केल्या जाते.ग्राहकांचे अधीकार महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना समजावे तसेच सध्याच्या जाहीरातीच्या युगातील प्रलोभनापासून ग्प्रहकांचा बचाव व्हावा, या प्रमुख उद्देशाने या शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. ग्प्रहक पंचायतीच्या कार्याचा आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. विनय कोडापे यांनी आढावा घेतला. संचालन विजय काळे यांनी तर आभार सुधीर देशपांडे यांनी मानले. कार्यक्रमाला प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांची बहुसंख्येने उपस्थिती होती.

# Photos of Programme



